**मे.भिमाशंकर सहकारी साखर कारखाना लि. (बी.एस.एस.के.एल) दत्तात्रय नगर, पो.पारगांव, व्हाया अवासरी बु.ता.आंबेगाव, जि.पुणे. यांच्या प्रस्तावित मळीवर आधारीत ४५ हजार लि. प्रती दिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्पाच्या जनसुनावणीचे इतीवृत्त.**

मे.भिमाशंकर सहकारी साखर कारखाना लि.(बी.एस.एस.के.एल) दत्तात्रय नगर, पो.पारगांव, व्हाया अवासरी बु.ता.आंबेगाव, जि.पुणे. यांच्या प्रस्तावित मळीवर आधारीत ४५ हजार लि. प्रती दिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्पाची जनसुनावणी दि.०३ जुलै,२०१९ रोजी प्रकल्पाच्या जागेवर सकाळी ११.०० वा.घेण्यात आली.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आदेश क्र.ई ४०/२०१९ च्या सहसंचालक (ज.प्र.नि.)/पी.एच/बी २२४७ दि.२४/०६/२०१९ नुसार खालील जनसुनावणीची समिती गठीत करण्यात आली.

| | |
|---|---|
| (१) अप्पर जिल्हा दंडाधिकारी,पुणे.<br>(जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्या प्रतिनीधी) | अध्यक्ष |
| (२) दिलीप खेडकर, प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ, पुणे<br>(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनीधी) | सदस्य |
| (२) उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ,पुणे-२. | समन्वयक |

जनसुनावणीचे समन्वयक तसेच उप-प्रादेशिक अधिकारी, श्री. उपेंद्र कुलकर्णी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे-२ यांनी समितीचे अध्यक्ष, डॉ. जयश्री कटारे तसेच सदस्य श्री.दिलीप खेडकर व जनसुनावणीसाठी उपस्थित असलेल्या सर्वांचे स्वागत केले. प्रथमत: समन्वयकांनी सदर जनसुनावणीचे कारण विस्तृत केले. पर्यावरण व वने तसेच वातावरण बदल मंत्रालय, भारत सरकार यांनी पारित केलेल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना दि.१४ सप्टेंबर, २००६ तसेच त्यात केले गेलेले बदल दि.०१ डिसेंबर, २००९ प्रमाणे काही प्रकल्पांबाबत जनसुनावणी घेणे अनिवार्य आहे, त्यानुसार सदर आसावणी प्रकल्प या आधिसूचनेमध्ये वर्ग ऐ-५ (जी) मध्ये मोडत असल्यामुळे जनसुनावणी घेण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच समन्वयकांनी वर उल्लेखित केलेल्या अधिसूचनेनुसार जनसुनावणीच्या तारखेपूर्वी एक महिना आगोदर म्हणजेच ०१ जून,२०१९ रोजी मराठी वृत्तपत्र लोकसत्ता तसेच इंग्रजी वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यामध्ये जनसुनावणीबाबत जाहीर नोटीस देण्यात आली होती, त्याच प्रमाणे प्रकल्पाबाबतचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व मराठी व इंग्रजी भाषेमधील संक्षिप्त टिप्पणी वेगवेगळ्या शासकिय कार्यालयात अभ्यासासाठी ठेवण्यात आला होता असे सांगितले.त्यानंतर जनसुनावणी समितीचे मा.अध्यक्ष यांची परवानगी घेऊन प्रकल्प प्रवर्तकास सदर प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यास विनंती केली.

प्रकल्प प्रवर्तकाचे पर्यावरण सल्लागार यांनी सदर प्रकल्पाचे सादरीकरण करून खालिल संक्षिप्त माहिती उपस्थितांना दिली.

मे.भिमाशंकर सहकारी साखर कारखाना लि.(बी.एस.एस.के.एल) दत्तात्रय नगर, पो.पारगांव, व्हाया अवासरी बु.ता.आंबेगाव, जि.पुणे. यांच्या प्रस्तावित मळीवर आधारीत ४५ हजार लि. प्रती दिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्प उभारत असून सदर प्रकल्प हा सध्या अस्तित्वात असलेल्या साखर कारखान्या जागेवर उभा राहणार असून प्रस्तावित प्रकल्पामध्ये हवा तसेच पाणी प्रदूषण होऊ नये यासाठी घेण्यात येणा-या उपाययोजनांबद्दल माहिती दिली. तसेच प्रस्तावित प्रकल्पाबाबतची थोडक्यात माहिती उपस्थितांना करून दिली.

श्री. दिलीप खेडकर, सदस्य,जनसुनावणी समिती यांनी जमलेल्या उपस्थितांना जनसुनावणी बाबतची संकल्पना विस्तृत केली, तसेच उपस्थितांना त्यांची मते, आक्षेप मांडण्याबाबत विनंती केली जेणेकरून त्यांची मते व आक्षेप हे पर्यावरण आघात मूल्यांकन अहवाल यामध्ये घेतली जातील तसेच उपस्थितांना ही एक संधी असून त्यांनी त्यांचे विचार व मते मांडावेत जेणेकरून पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात येतील. तद्नंतर काही उपस्थितांनी आपल्या शंका मांडल्या त्या खालिल प्रमाणे, त्याचबरोबर प्रकल्प प्रवर्तकाचे पर्यावरण सल्लागार यांनी त्याच्या शंकाना उत्तरे दिली.

१. **श्री. बाबाजी दगडू कारंडे, रा.काठापूर बु.,ता. आंबेगाव, जि.पुणे**

- प्रस्तावित आसवणी प्रकल्पामधून निर्माण होणा-या सांडपाण्यावर कोणती प्रक्रिया करण्यात येणार आहे?

**प्रकल्प प्रवर्तक**- सदर प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी या प्रकल्पातून निर्माण होणा-या सांडपाण्यावर मल्टिपल इफेक्ट इव्होपरेटरद्वारे प्रक्रिया केली जाणार असून त्यातून निघणा-या कंडनसेटवर पुढे प्रक्रिया करून सदर पाणी पुन्हा प्रक्रियेसाठी वापरण्यात येणार आहे. तसेच मल्टिपल इफेक्ट इव्होपरेटरद्वारे प्रक्रिया केल्यानंतर निर्माण होणारा घनकचरा हा बॉयलरला इंधन म्हणून वापरण्यात येणार आहे, असे सांगितले.

२. **श्री.अशोक चिमाजी मेंगाडे, रा. मंगाजेवाडी, ता.आंबेगाव, जि.पुणे.**

- आसावणी प्रकल्पातून हवा प्रदूषण होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना केली जाणार आहे?

**प्रकल्प प्रवर्तक**- प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सदर प्रकल्पासाठी १६ टन क्षमतेचा नविन बॉयलर लावण्यात येणार असून त्यासाठी अतिरिक्त हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा म्हणून इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपिटेटर व ६० मि.उंचीचे धुरांडे बसविण्यात येणार आहे.

३. **श्री. अशोक लाबडे, रा.पारगाव, ता.आंबेगाव, जि,पुणे.**

- नविन धुरांडे सदर प्रकल्पासाठी बसविण्यात येणार आहे का?

**प्रकल्प प्रवर्तक**- प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी या प्रकल्पासाठी नविन ६० मि.उंचीचे धुरांडे बसविण्यात येणार आहे, असे सांगितले.

४. श्री. पांडूरंग वाळूंज, रा.पोंडेवाडी, ता.आंबेगाव. जि.पुणे.

- यापूर्वी येथे सुरू झालेल्या साखर कारखान्यांवर येथिल शेतक-यांनी ऊसाचे पीक घेण्यास सुरवात केली, त्यामुळे आर्थिक सुलभता आली. तसेच नोक-यांची उपलब्धता वाढली परंतु, ऊसाच्या पीकांवर जंगली श्वापदांची भिती असल्याबाबत सांगितले.

-**श्री. दिलीप खेडकर, समितीचे सदस्य** - यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाबाबतच प्रश्न विचारण्यात यावे. तसेच सदर प्रश्न हे या प्रकल्पामुळे पर्यावरणामध्ये होणा-या बदलाबाबत विचारण्यात यावे, असे सांगितले.

५. श्री. राजेंद्र रामचंद्र गवारी, रा.मेंगडेवाडी, ता,आंबेगाव, जि.पुणे.

- सदर प्रकल्पामध्ये कोणती उत्पादने घेतली जाणार आहेत ?

**प्रकल्प प्रवर्तक**- प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सदर प्रकल्पामध्ये रेक्टिफाइड स्पिरिट, इथेनॉल तसेच अल्कोहोल इत्यादींचे उत्पादन घेण्यात येणार आहे, असे सांगितले.

६. श्री. विजय परशुराम शिंदे, रा.जावळे, ता. आंबेगाव, जि.पुणे.

- प्रस्पावित आसावणी प्रकल्प सध्या स्थित असलेल्या साखर कारखान्याच्या परिसरात उभा राहणार आहे किंवा वेगळ्या जागेत प्रयोजन आहे.

**प्रकल्प प्रवर्तक**- प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित आसवणी प्रकल्प हा सध्या अस्तित्वात असलेल्या साखर कारखान्याच्या जागेत उभा राहणार असल्याचे सांगितले.

७. नितीन बबन जाधव, रा, धामणी, ता.आंबेगाव, जि.पुणे.

- सदर आसावणी प्रकल्प उभारण्यासाठी किती खर्च येणार आहे?

**प्रकल्प प्रवर्तक**- प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सदर आसवणी प्रकल्प उभारण्यासाठी साधारणपणे ६२.७८ करोड इतका खर्च अपेक्षित असल्याचे सांगितले आहे.

८. श्री. रामचंद्र लायगुडे, रा. जावळे, ता.आंबेगाव, जि.पुणे.

- सदर प्रकल्प सुरू होण्यासाठी किती कालावधी लागणार आहे ?

**प्रकल्प प्रवर्तक**- प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी शासनाच्या सर्व परवानग्या मिळाल्या नंतर साधारणपणे एक वर्षानंतर प्रकल्प सुरू होईल, असे उपस्थितांना अवगत केले.

९. श्री. नवनाथ राजाराम मेहतरे, रा. शिंगवे पारगाव, ता.आबेगाव, जि.पुणे.

- प्रस्तवित प्रकल्पामुळे किती लोकांना नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहेत?

**प्रकल्प प्रवर्तक**- प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी या प्रकल्पासाठी एकूण ७२ कामगारांची आवश्यकता असून त्यांपैकी ३४ तज्ञ कामगार लागणार आहेत, असे सांगितले.

१०. श्री. राजेंद्र पोखरकर, पिंपळगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे.

- प्रस्तावित प्रकल्पासाठी किती जागेची आवश्यकता आहे ?

**प्रकल्प प्रवर्तक**- प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित आसवणी प्रकल्पासाठी ८.५ एकर इतक्या जागेची आवश्यकता असल्याचे सांगितले.

११. रुरल एन्व्हायरमेंट अन्ड हेल्थ अवेरनेस सोसयटी, मुशीराबाद, हैदराबाद

उपरोक्त पत्र या कार्यालयास प्राप्त झाले. सदर पत्रामध्ये ऊन्हाळ्याच्या दिवसामध्ये घोड नदीतून पाणी घेताना अडचण निर्माण होईल, त्यामुळे रेन वॉटर हार्वेस्टिंग उपाययोजना करावी, उद्योगाच्या १० किमी परिघामधील गावातील लोकांची आरोग्याची तपासणी करावी, तसेच उद्योगाच्या जवळील पिकांच्या उत्पादनाची माहिती ठेवावी.

१२. श्री. दिलीप खेडकर, समिती सदस्य

- वर उल्लेखित केलेल्या उपस्थितांचे प्रश्न तसेच त्यास देण्यात आलेल्या उत्तरानंतर श्री. दिलीप खेडकर, समिती सदस्य यांनी उपस्थितांना आपले अजून काही प्रश्न व सूचना असल्यास त्या इथे मांडाव्यात जेणेकरून प्रस्तावित प्रकल्पास पर्यावरण अनुमती देताना कडक अटी घालण्यात येतील. तसेच त्यांनी प्रकल्प प्रवर्तकास प्रस्तावित आसवणी प्रकल्पामुळे वृक्ष तोड करण्यात येणार असल्यास किती वृक्ष तोड करण्यात येणार आहे व त्याच प्रमाणे तोडण्यात आलेल्या वृक्षांचे पूर्नव्यवस्थापन कसे करणार आहात असे विचारले. तसेच प्रकल्पाच्या मोकळ्या जागेच्या ३३ % जागा ही वेगळी ठेवावी, असेही उल्लेखित केले.

**प्रकल्प प्रवर्तक**- प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाच्या जागेवर सध्या ऊसाची लागवड केलेली असून श्री. दिलीप खेडकर, समिती सदस्य यांनी केलेल्या सल्ल्याचे पालन करण्यात येईल, असे सांगितले.

१३. डॉ. जयश्री कटारे, समिती अध्यक्ष

- प्रस्तावित आसवणी प्रकल्पातून निर्माण होणा-या सांडपाण्यावर पूर्णत: प्रक्रिया करण्यात येणार असून प्रकल्पातून येणारे सांडपाणी हे जमिनीवर सोडले जाणार नाही असे नमूद केले असल्यामुळे प्रकल्प प्रवर्तकांनी सदर बाब लक्षात घेता ही अट प्रामुख्याने आमलात आणावी.

**प्रकल्प प्रवर्तक**- प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित आसवणी प्रकल्प हा शून्य निश्काशन प्रकल्प असून प्रकल्पातून निघणारे सांडपाणी जमिनीवर सोडले जाणार नाही याची हमी दिली.

शेवटी उपस्थितांकडून प्रकल्पाबाबत प्रश्न किंवा सल्ले उपस्थित केले जात नाही हे लक्षात आल्यावर मा. अध्यक्ष यांनी जनसुनावणी संपली असल्याचे जाहीर केले.

(उपेंद्र कुलकर्णी)
समन्वयक तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
पुणे-२

(दिलीप खेडकर)
समिती सदस्य
प्रादेशिक अधिकारी
म.प्र.नि.मंडळ, पुणे

(डॉ. जयश्री कटारे)
समिती अध्यक्ष तथा
अप्पर जिल्हा दंडाधिकारी,
पुणे.